# अफगाणिस्तानचा इंग्लंडवर रोमहर्षक विजय

## चॅम्पियन्स ट्रॉफीतून इंग्लंड बाहेर

## उमरझाई-झादरान ठरले विजयाचे हिरो

**लाहोर, दि. २६ :**

अफगाणिस्तान संघाचा आयसीसी स्पर्धेत अजून एक मोठा उलटफेर केला आहे. अफगाणिस्तानने इंग्लंडचा चॅम्पियन्स ट्रॉफीत ८ विकेट्सने पराभव करत मोठा अपसेट केला. यासह इंग्लंडचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील आव्हान संपुष्टात आले आहे. तर अफगाणिस्तानचा संघ अजूनही उपांत्य फेरी गाठण्याच्या शर्यतीत कायम आहे. अफगाणिस्तानकडून अझमतुल्ला उमरझाईने ५ विकेट्स तर इब्राहिम झादरानने १७७ धावांची खेळी केली, जे संघाच्या विजयाचे हिरो ठरले.

इब्राहिम झद्रानचे (१७७) शानदार शतक आणि अझमतुल्ला ओमरझाई (४१ धावा आणि ५ विकेट) याच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर अफगाणिस्तानने शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या सामन्यात इंग्लिश संघाचा अवघ्या ८ धावांच्या फरकाने पराभव केला.

अफगाणिस्तानने पहिल्यांदा आयसीसी स्पर्धेत ३०० धावांचा पल्ला पार केला. यासह अफगाणिस्तानने ३२५ धावांचा टप्पा गाठला. इब्राहिम झादरानची १७७ धावांची वादळी खेळीने संघाच्या या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात दोन्ही संघांची सुरुवात खराब झाली. पण अफगाणिस्तानने कमालीचं पुनरागमन करत ३२५ धावा केल्या. झादरानने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अफगाणिस्तानसाठी पहिलं शतक झळकावले आणि त्यानंतर या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठी खेळी खेळताना १७७ धावा केल्या. अफगाणिस्तानने ९व्या षटकातच संघाने ३ विकेट गमावल्या. हे तीन विकेट स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने घेत अफगाणिस्तानला अडचणीत आणले. पण इथून इंग्लंडच्या गोलंदाजीची अवस्था बिकट झाली आणि अफगाणिस्तानने पुनरागमन केले.

अफगाणिस्तानने ३७ धावांत ३ विकेट गमावल्यानंतर इब्राहिम झादरानने कर्णधार हशमतुल्ला शाहिदीबरोबर शतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. शाहीदीने ४० धावा केल्या. तर यानंतर अझमतुल्ला ओमरझाईने ४१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. यानंतर मोहम्मद नबीने तर इंग्लिश संघाची धुलाई करत २४ चेंडूत ३ षटकार आणि २ चौकारांसह ४० धावा केल्या. झादरान आणि नबीने २०० च्या स्ट्राईक रेटने ५० चेंडूत शतकी भागीदारी करत संघाच्या विजयाचा पाया रचला.



## निवडक



**मार्ना शिवोली : श्री देव शिवलिंग मंदिरमद्धे उपस्थित भाविक.**

### शिवोलीत महाशिवरात्री उत्सव थाटात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**शिवोली, दि. २६** : शिवोली ओशेल परिसरात महाशिवरात्री उत्सव थाटात झाला. मार्ना शिवोली येथील श्री देव शिवलिंग मंदिर,राय शिवोली येथील श्री स्वामी समर्थ मठ, ओशेल येथील श्री देवी कालिका पंचायतन देवस्थान,श्री देवी महाकालिका कुंभेश्वर देवस्थान व अन्य ठिकाणी भक्तांनी सकाळपासूनच अभिषेक करण्यासाठी गर्दी केली. यानिमित्त विविध ठिकाणी सांस्कृतिक व इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### बडबडगीत स्पर्धेत ध्रीती वेर्लेकर प्रथम

टीम दैनिक हेराल्ड




**पणजी : द्वितीय पारितोषिक विजेती यादवी मयेकर हिला पारितोषिक देताना अरविंद वाघ.**

**पणजी, दि. २६ :** स्वामी विवेकानंद सोसायटी पणजीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या बडबडगीत स्पर्धेत ध्रीती वेर्लेकर हिने प्रथम पारितोषिक पटकावले. यादवी रवी मयेकर हिला द्वितीय तर धिरजा वरद करमली हिला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. अर्शिका प्रभू हिला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. वीणा भरणे व उज्वला दळवी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. संस्थेचे अध्यक्ष अरविंद वाघ यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. सचिव गजानन गोलतकर यांनी सूत्रसंचालन केले.

### साळ येथील महादेव, सिद्धेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी



**साळ : महादेव मंदिरात महाशिवरात्री दिवशी श्रीगणेश पूजन व अभिषेक करताना भाविक तसेच पुरोहित शंकर गाडगीळ व पुरोहित यशवंत गाडगीळ, शांताराम भावे.**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. २६ :** साळ येथील श्री महादेव देवस्थान (खालचावाडा) व श्री सिद्धेश्वर देवस्थान (वरचावडा) येथे महाशिवरात्री उत्सवात भाविकांची दुपारपर्यंत गर्दी होती. सकाळी सात वाजल्यापासून भाविकांकडून मंदिरात पुरोहित यशवंत गाडगीळ व पुरोहित शंकर गाडगीळ, शांताराम भावे (वझरे दोडामार्ग) यांच्याकरवी भाविकांकडून श्री गणेश पूजन त्यानंतर शिवपिंडीवर दुग्धाभिषेक तसेच बिल्वदलांनी अभिषेक करण्यात आला. हा कार्यक्रम दुपारपर्यंत चालू होता. महाशिवरात्रीनिमित्त श्री महादेव मंदिरात साळ, कुमयामळा, खोलपेवाडी, धुमासे, वडावल, साळ पुनर्वसन तसेच पंचक्रोशीतील इतर गावातील भाविक मोठ्या संख्येने श्री महादेव मंदिरात उपस्थित राहून भाविकांकडून शिवपिंडीवर अभिषेक कार्यक्रम पार पडला. सकाळपासून भाविकांची गर्दी उसळली होती. यामुळे एकावेळी पंधरा भाविकांकडून अभिषेक कार्यक्रम पार पाडत होता, असे शेकडो भाविक महाशिवरात्री उत्सवात सामील होऊन श्री महादेव प्रती आपली श्रद्धा अर्पित केली.

### धनंजय जोग यांच्या 'ग्राहक हक्क जागृती' पुस्तकाचे उद्या प्रकाशन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** राजभाषा संचालनालय यांनी इन्स्टिट्यूट मिनेझीस ब्रागांझा यांच्या संयुक्त विद्यमाने, गोवा राज्याच्या ग्राहक न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश धनंजय जोग यांच्या 'ग्राहक हक्क जागृती' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शुक्रवार दि. २८ रोजी दुपारी ३ वाजता इन्स्टिट्यूट मिनेझीस ब्रागांझा, पणजी या संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. सदर पुस्तकात ५0 निवडक न्याय निवाड्यांचे मराठी भाषेतून भाषांतर करून त्याला कथालेखाचे स्वरुप दिले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इन्स्टिट्यूट मिनेझीस ब्रागांझाचे अध्यक्ष श्री. दशरथ परब उपस्थित असतील. तसेच, राज्य माहिती आयुक्त ॲड. आत्माराम बर्वे हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राजभाषा संचालनालयाचे संचालक प्रशांत शिरोडकर यांनी केले आहे.

### तळपण येथील सातेरी देवस्थानचा ६ मार्चला वर्धापनदिन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**आगोंद, दि. २६** : पैंगीण पंचायत क्षेत्रांतील घाणेबाग,तळपण येथील श्री सातेरी देवस्थानचा २0 वा वर्धापन दिन दि.६ मार्च रोजी, विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनिशी साजरा करण्यात येईल. सकाळी सत्यनारायण महापूजा, आरती, तीर्थ-प्रसाद वितरण होईल. त्यानंतर रात्री उदय ठक्कर दिग्दर्शित विघ्नहर्ता नाटक सादर केले जाईल. यानाटकात उदय ठक्कर, प्रकाश मेत्री, चंद्रकांत मेत्री, राजेश मेत्री, देऊ मेत्री, तुळशीदास मेत्री, नंदेश ठक्कर, दीपक कोमरपंत, जयेश नाईक, रिया कोमरपंत, तसेच सिद्धार्थ, सत्यनारायण, ऐश्वर्य, चंद्रकांत, गणपत, अनुप, चिन्मय, हे स्थानिक कलाकार भाग घेणार आहेत. या नाटकाचे सुत्रधार उल्हास मेत्री, माधव मेत्री व नारायण ठक्कर हे आहेत.

### आमोणकर विद्यामंदिरात शिव जयंती उत्साहात साजरी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. २६** : जी.एस. आमोणकर विद्यामंदिराच्या सभागृहात आठवीच्या विद्यार्थ्यांकडून शिवजयंतीचा कार्यक्रम पार पाडला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोला पुष्पहार घालून झाली. शिक्षक महेंद्र बिल्गोजी व विद्यार्थी सार्थक जाधव यांची समर्पक भाषणे झाली. सकाळी विद्यार्थिनी वेदिका सालेलकर हिने कविता सादर केली. विद्यार्थी सर्वेश साळगांवकर याने छत्रपती शिवाजी महाराजांवर मनोगत प्रस्तुत केले. त्यानंतर विद्यार्थ्यांचे नृत्य व संगीत नाट्य झाले. विद्यार्थिनी शामिका चिपकर हिने पावडा प्रस्तुत केला. त्यानंतर शिवजयंती निमित्त घेतलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा दळवी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सात्विक भोमकर व इशीका शिरोडकर या विद्यार्थ्यांनी केले.

# जय भंडारी फाऊंडेशनतर्फे मोखर्ड येथे स्वा. सैनिक बाळा मापारी पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मोखर्ड, काणकोण : स्वा. सैनिक बाळा मापारी पुण्यतिथी कार्यक्रमात मंदिराचे अध्यक्ष रामू नाईक, जयेश नाईक व इतर.**

**आगोंद, दि. २६** : जय भंडारी फाउंडेशन, काणकोण यांनी गोव्याच्या स्वातंत्र्य संग्रामातील पहिले हुतात्मा, हुतात्मा बाळा राया मापारी यांची ७0वी पुण्यतिथी बलिदान दिवस म्हणून साजरी केली.

जय भंडारी फाऊंडेशन, काणकोण यांच्या वतीने श्री गोपाळकृष्ण मंदिर, मोखर्ड, काणकोण येथे कार्यक्रमाचे खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गोव्याच्या स्वातंत्र्य संग्रामातील पहिले हुतात्मा हुतात्मा बाळा राया मापारी आणि स्वर्गीय बाळाराया मापारी यांच्या ७0 व्या पुण्यतिथीनिमित्त, वयाच्या २६ व्या वर्षी गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. हुतात्मा बाळा मापारी यांचे शौर्य, बलिदान, गोव्याच्या स्वातंत्र्य संग्रामातील पहिल्या हुतात्म्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी संपूर्ण गोव्यात बलिदान दिवस म्हणून साजरा केला जातो.

जय भंडारी फाऊंडेशन काणकोण यांनी हुतात्मा बाळा मापारी यांच्या पुण्यतिथी निमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता. जो गोव्यातील जातीय आणि बहुसंख्य समुदाय असलेल्या भंडारी समुदायाचा देखील आहे. श्री गोपाळकृष्ण मंदिराचे अध्यक्ष रामू नाईक, जयेश नाईक-संयोजक, जय भंडारी फाऊंडेशन, काणकोण व इतर मान्यवरांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून हुतात्मा बाळा राया मापारी यांना आदरांजली वाहिली.

गोव्याच्या स्वातंत्र्य चळवळीसाठी निरंकुश, निर्दयी पोर्तुगीजांविरुद्ध लढून मृत्यूला कवटाळणारे कै. बाळा मापारी यांच्या वीर शौर्याचे स्मरण या मेळाव्यात करण्यात आले. मान्यवरांनी स्व. बाळा मापारी यांनी आपल्या प्रिय मातृभूमीसाठी आपल्या कोवळ्या वयाचे बलिदान दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आणि आपल्या गोव्याचे भावी पिढीसाठी सर्व वाईटांपासून संरक्षण करण्यासाठी कठोर परिश्रम घेण्याचे आश्वासन दिले.

# मांद्रे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे विज्ञान स्पर्धेत यश




**मांद्रे : मांद्रे हायस्कूलने,मोरजीतील विज्ञान दिनी स्पर्धेत यश मिळवले. सोबत विद्यार्थी.**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २६** : विद्या प्रसारक हायस्कूल मोरजी येथे नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन, न्यू दिल्ली यांच्या सहकार्याने व गोवा स्टेट कौन्सिल ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी सालीगाव गोवा तसेच विद्या प्रसारक हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये मांद्रे हायस्कूल मांद्रेच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत आपली चमक दाखवली.

विज्ञान उपक्रम स्पर्धेत मुस्कान सैनी व साईदीप कांबळी यांना द्वितीय पारितोषिक, प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये प्राजक्ता नाईक हिला प्रथम पारितोषिक व निबंध स्पर्धेत सिया गडेकर हिला प्रथम पारितोषिक मिळाले. शाळेच्या विज्ञान विषयाच्या शिक्षिका अनुपा देसाई, वर्षा पार्सेकर व प्रयोगशाळा सहायिका दीक्षा जोशी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाचे संस्थेचे चेअरमन केशव मांद्रेकर व मुख्याध्यापिका अपर्णा प्रभू यांनी कौतुक केले आहे.

# जायंट्स ग्रुप ऑफ पणजीचे अधिकारग्रहण

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६** : जायंट्स ग्रुप ऑफ पणजीचा अधिकारग्रहण सोहळा नुकताच मिरामार येथील गास्पर डायस क्लबमध्ये मोठ्या उत्साहात पार पाडला. यावेळी गोव्याचे सुप्रसिद्ध फुटबॉलपटू ब्रह्मानंद सगुण कामत शंखवळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्तित होते. बिपीन कारापूरकर यांना २०२५ सालासाठी अध्यक्ष म्हणून यावेळी शपथ देण्यात आली. प्रकाश महाब्रे, लक्ष्मीकांत आमोणकर यांना उपाध्यक्षपदी, तर राजू चोडणकर प्रशासकीय संचालकपदी, उमेश प्रभुगावकर अर्थ संचालकपदी शपथ देण्यात आली. संचालकपदी रोहिदास वायगंणकर, विवेक जोशी, प्रदीप नाईक, भावेश दोशी आणि ओंकार वायगंणकर यांनी शपथ घेतली. शपथग्रहण अधिकारी भालचंद्र आमोणकर यांनी त्यांना शपथ दिली.




**पणजी : अधिरारग्रहण कार्यक्रमात उपस्थित ब्रह्मानंद कामत शंकवाळकर, बिपीन कारापूरकर, संदीप नाडकर्णी, दीपक डिसोझा, वर्षा नाईक, नजरेत वाझ, राजेंद्र कामत व मान्यवर**

प्रारंभी मावळते अध्यक्ष राजेंद्र कामत यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

प्रमुख पाहुणे यांनी संस्थेच्या सामाजिक क्षेत्रात कार्यपद्धतीबद्दल गौरवोदगार काढले. स्पोर्ट्स्पर्सनबद्दल बोलत असताना पाहुणे म्हणाले की, क्रीडा व्यक्तीचं कर्तृत्ववाची लोकांना ज्ञात असते परंतु दुखापतिमुळे संघर्ष करणे माहित नसतं. स्वतःच उदाहरण देऊन ते म्हणाले त्यांनी ग्रुपला पुढील कार्यासही शुभेच्छा दिल्या. यावेळी फेडेरेशनचे अध्यक्ष संजय बाणावलीकर आणि वर्षा नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर संदीप नाडकर्णी, दीपक डिसोझा आणि नाजरेत वाझ उपस्थित होते. मावळते प्रशासकीय संचालक प्रकाश महाब्रे यांनी प्रकल्प अहवाल सादर केला. संजय गांवकर यांनी पाहुण्याची ओळख करून दिली. भालचंद्र आमोणकर यांनी सूत्रसंचालन केले. तर राजू चोडणकर यांनी आभार मानले.

# आयसीसी वनडे रँकिंगमध्ये कोहली पाचव्या स्थानी

## शुभमन गिल पहिल्या, रोहित शर्मा तिसऱ्या स्थानावर

**मुंबई, दि. २६ :**

आयसीसीने बुधवारी त्यांची साप्ताहिक क्रमवारी अपडेट केली. भारताचा विराट कोहली फलंदाजांच्या क्रमवारीत पाचव्या क्रमांकावर पोहोचला. त्याने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात शतक झळकावले. फलंदाजांच्या क्रमवारीत शुभमन गिल पहिल्या स्थानावर आहे आणि रोहित शर्मा तिसऱ्या स्थानावर आहे.

गोलंदाजांच्या क्रमवारीत कुलदीप यादव तिसऱ्या क्रमांकावर आहे. श्रीलंकेचा महीष तीक्षणा अव्वल स्थानावर आहे. अष्टपैलू खेळाडूंमध्ये अफगाणिस्तानचा मोहम्मद नबी अव्वल स्थानावर आहे, तर भारताचा रवींद्र जडेजा नवव्या स्थानावर आहे.

विराट कोहलीने पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावले. रँकिंगमधील या कामगिरीचा फायदा त्याला मिळाला. तो ७४३ गुणांसह सहाव्या स्थानावरून




पाचव्या स्थानावर पोहोचला. पाकिस्तानचा बाबर आझम दुसऱ्या स्थानावर आहे आणि दक्षिण आफ्रिकेचा हेनरिक क्लासेन चौथ्या स्थानावर आहे. भारताचा श्रेयस अय्यर टॉप-१० मध्ये ९ व्या क्रमांकावर आहे. केएल राहुल दोन स्थानांनी पुढे सरकून १५ व्या क्रमांकावर पोहोचला.

भारताच्या मोहम्मद शमीने आयसीसी एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत १ स्थान मिळवले. त्याने बांगलादेशविरुद्ध ५ विकेट्स घेतल्या. तो ५९९ गुणांसह १४ व्या स्थानावर पोहोचला. मोहम्मद सिराज १२ व्या स्थानावर आहे आणि रवींद्र जडेजा १३ व्या स्थानावर आहे. अफगाणिस्तानचा रशीद खान दुसऱ्या स्थानावर आहे आणि भारताचा कुलदीप यादव तिसऱ्या स्थानावर आहे.

आयसीसीच्या एकदिवसीय अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत न्यूझीलंडचा मायकेल ब्रेसवेल २६ स्थानांनी पुढे गेला. तो २०० गुणांसह ११ व्या स्थानावर पोहोचला. टॉप-१० मध्ये असलेला एकमेव भारतीय खेळाडू रवींद्र जडेजा ९ व्या क्रमांकावर आहे. अफगाणिस्तानचा मोहम्मद नबी अव्वल स्थानावर आहे.

एकदिवसीय संघ क्रमवारीत भारत पहिल्या क्रमांकावर कायम आहे. संघाचे १२० गुण आहेत. ऑस्ट्रेलिया ११० गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. दरम्यान, चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सहाव्या दिवशी स्पर्धेतून बाहेर पडलेला यजमान पाकिस्तान तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याचे १०६ गुण आहेत.

# हरवळे येथे महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी



**हरवळे : मुख्यमंत्री डॉ.. प्रमोद सावंत यांनी सपत्निक हरवळे येथील श्री रुद्रेश्वर देवस्थानात उपस्थिती लावून श्रीचे दर्शन घेतले.**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २६** : महाशिवरात्री उत्सवानिमित्त हरवळे येथील श्री रुद्रेश्वर देवस्थानात भाविकांची मोठी गर्दी पहाटेपासूनच लाभली असून मुक्त हस्ते अभिषेक करण्याची संधी लावल्याने भाविकांनी मध्यरात्री दोन वाजल्यापासूनच गर्दी केली होती या ठिकाणी भाविकांसाठी उत्तम व्यवस्था करण्यात आल्याचे देवस्थान समितीतर्फे सांगण्यात आले

डिचोली तालुक्यातील वडावल पाळी सुर्ला, कुडणे वाठा देव गोठणेश्वर सप्तकोटेश्वर नार्वे, मुळगाव येथील महादेव मंदिर तसेच तालुक्यातील विविध महादेव मंदिरात महाशिवरात्रीचा उत्सवनिमित्त हजारो भाविकांनी दर्शन घेऊन आपल्या भावी आयुष्यासाठी श्री चरणी प्रार्थना केली. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद चव्हाण यांनी हरवळे येथे देव रुद्रेरश्वर सपत्निक दर्शन घेऊन गोमंत किया ना उत्तम आरोग्य आयुष्य लाभावे गोव्याची प्रगती सातत्याने होत व्हावी अशा प्रकारची प्रार्थना केली.

तसेच त्यांनी यावेळी मंदिर परिसर पर्यटन केंद्रे या ठिकाणी परिसर स्वच्छ ठेवणे सुंदर ठेवणे प्लास्टिक मुक्त ठेवणे यासाठी भर देण्याचे आवाहन केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 175 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .